**निशाणी क्र. यू - १०** **डब्लूसीए नं. ८२/सी-८/१९**

**अर्जदाराचा उलटतपास जाबदार क्र. २ वकील श्री. जे.ए. लेले यांच्यामार्फत शपथेवर सुरू.**

माझी जन्म तारीख १३/०७/१९७८ आहे. मी सामनेवाला क्र. १ यांची कार चालवत होतो. हे म्हणणे खरे आहे की, ती कार प्रवासी वाहतूक करणारी होती. अपघात हा नागोठणे जवळ मुंबई गोवा महामार्गावर झाला. मी हरीहरेश्वर कडून मुंबईच्या दिशेला निघालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या समोरून टायोटो इनोवा कार येत होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या बाजूने गाडी चालवून समोरून येणा-या इनोवाला ठोकर दिली. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या विरूद्ध अपघाताचा गुन्हा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघात माझ्या चुकीमुळे झाला होता.

अपघातामध्ये मला डाव्या हाताला, छातीला व खांदयाला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, दि ३१/०७/२०१९ नंतर मी उपचार घेतलेले नाहीत. मी घेतलेल्या उपचारांची कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. मी या कामी औषधोपचारांची रक्कम रू. २५०००/- ची बिले दाखल केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सामनेवाला क्र. १ मला दर महा ८०००/- रू इतका पगार देत होते हे दर्शविण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा अपघात कामावर नसताना झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मध्य व सामनेवाला क्र. १ मध्ये नोकर मालक संबंध नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मला अपघातामुळे कोणत्याही प्रकारचे अपंगत्व आलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अपघात झाला त्या वेळेस माझ्याकडे योग्य वाहन परवाना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे विमा कंपनीच्या अटीशर्तींचा भंग झाल्यामुळे ते मला नुकसान भरपाई देण्यास

जबाबदार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी या अर्जातून अवास्तव नुकसान भरपाईची मागणी केलेली आहे.  हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृती,**

HANGE GAURAV SADASHIV

Digitally signed by HANGE GAURAV SADASHIV
Date: 2025.12.18 13:41:59 +0530

दिनांक - २५/११/२०२५

स्थळ - अलिबाग.

**( गौ. स. हांगे )**
**न्यायाधीश**
**कामगार न्यायालय, रायगड - अलिबाग.**